साक्षीदार क्र. १

**शपथेवर सुरुः—**

**पुढील उलटतपास आरोपीकरीता ॲड. हर्षद पालवे यांचेतर्फे :—**

१६. आमच्या संस्थेमध्ये अंदाजे २०० कर्मचारी कार्यरत आहे. त्यामध्ये शिक्षक व इतर पदावर काम करणा—या कर्मचा—यांचा समावेश आहे. आमच्या संस्थेमध्ये अनुदानित व विनाअनुदानित विभाग असून त्यापैकी अनुदानित विभागामध्ये शासनाची शिक्षकीय कर्मचा—यांच्या पदाची मंजूर संख्या २२ असून सध्या ९ कर्मचारी कार्यरत आहे. तसेच शिक्षकेतर कर्मचा—यांची मंजूर पदसंख्या १४ असून प्रत्यक्षात माझ्या सेवा निवृत्तीपर्यंत ६ कर्मचारी कार्यरत होते. सदरील १५ कर्मचारी वगळता इतर कर्मचारी हे विनाअनुदानित विभागामध्ये कार्यरत आहे. आमच्या संस्थेमध्ये श्रीमती. शिल्पा चौगले या विनाअनुदानित विभागाच्या प्रमुख आहेत. हे म्हणणे खरे आहे की, अनुदानित व विनाअनुदानित विभागाचे प्रशाकिय प्रमुख वेगवेगळे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हा श्रीमती. शिल्पा चौगले यांच्या नियत्रंणाखाली काम करत होता. त्यामुळे आरोपीला जी जबाबदारी देण्यात आली होती त्याबाबतचे सर्व अहवाल तो श्रीमती. शिल्पा चौगले यांच्याकडे सादर करत असे. (साक्षीदाराने स्वत:हून असे सांगितले की, लेखा विषयक बाबी असतीत तर त्या सर्व बाबींचा अहवाल हा आरोपीतर्फे अंतर्गत हिशोब तपासणीस श्री. शेखर दांडेकर यांच्याकडे दयावा लागत असे.) श्रीमती. शिल्पा चौगले या त्यांच्या विभागाचा अहवाल त्यांच्या कोणत्या वरिष्ठाकडे सादर करत असे याबाबतची मला वैयक्तिक माहिती नाही. मी माझ्याकडे असलेल्या विभागाचा अहवाल हा प्राचार्य श्री. सुरेश सिंग यांच्याकडे सादर करत असे. आमच्या संस्थेचे अनुदानित व विनाअनुदानित विभागाचे कार्यालय प्रभादेवी येथिल इमारतीमध्ये दुस—या मजल्यावर स्थित आहे. संस्थेचे चेअरमन व इतर पदअधिकारी यांचे कार्यालय हे त्याच इमारतीच्या चौथ्या मजल्यावर आहे. संस्थेचे चेअरमन व व्हाईस चेअरमन यांच्याशी माझा वैयक्तिक दैनंदिन कामकाजामध्ये काहीही संबंध येत नसे. हे म्हणणे खरे आहे की,

प्राचार्यांचा शिक्षक कर्मचा—यांशी रोजचा संपर्क असे. माझा व शिक्षक कर्मचा—यांचा तसा रोजचा कोणताही संपर्क होत नसे. पोलीसांनी तपासा दरम्यान प्राचार्य यांचा जबाब माझ्या समक्ष नोंदवला नव्हता. त्याचप्रमाणे माझ्या माहितीप्रमाणे तपासा दरम्यान श्रीमती. शिल्पा चौगले यांचा तपासी अधिकारी यांनी जबाब नोंदवलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्यादी जबाबा व्यतिरिक्त माझा दुसरा कुठलाही जबाब नोंदवण्यात आलेला नाही. गुन्हा नोंदवण्यता आल्यानंतर संस्थेच्यावतीने पोलीस स्टेशनला प्रस्तुत प्रकरणासंदर्भात माझे निलंबन होईपर्यंत जाणे येणे होते. दि. २६.१२.२०२४ रोजी संस्थेने मला निलंबित केले. सध्या माझी विभागीय चौकशी सुरु आहे. माझ्याप्रमाणेच प्राचार्य यांना देखिल त्याच तारखेला म्हणजेच दि. २६.१२.२०२४ रोजी निलंबित करण्यात आले. त्यानंतर प्राचार्य यांचा दि. १९.०१.२०२५ रोजी मृत्यू झाला.

१७. माझी विभागिय चौकशी हि गैरवर्तनाच्या आरोपांवरुन करण्यात येत आहे. ती विभागिय चौकशी देखिल प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगानेच करण्यात येत आहे. (साक्षीदाराने स्वतःहून असे सांगितले की, त्यांची संपूर्ण सेवा हि निष्कलंक असून संस्थेने खोटे आरोप लावून विभागिय चौकशी सूरु केले असून त्यातील संपूर्ण आरोपाचे त्यांनी खंडण केलेले आहे.) आरोपी विरुध्द संस्थेने विभागिय चौकशी सुरु केले आहे किंवा कसे याची मला माहिती नाही. (साक्षीदाराने स्वतःहून असे सांगितले की, जो पर्यंत ते संस्थेमध्ये कार्यरत होते तो पर्यंत संस्थेने आरोपी विरुध्द विभागिय चौकशी सुरु केली नव्हती. त्यांच्या निलंबनानंतर आरोपीबाबत प्रशाकिय स्तरावर कार्य निर्णय घेण्यात आलेले आहे त्यांची त्यांना वैयक्तिक माहिती नाही.) हे म्हणणे खरे नाही की, माझी विभागिय चौकशीतून दोषमुक्ती व्हावी यासाठी मी आरोपी विरुध्द संस्थेच्यावतीने खोटी साक्ष देत आहे.

१८. दि. ०६.११.२०२४ पूर्वी मला कुठल्याही शिक्षकाने त्यांना वेतन मिळाले नसल्याबाबतची माहिती व्यक्तिगत भेट देउन दिलेली नव्हती. दि. ०६. ११.२०२४ पूर्वी प्राचार्यांना शिक्षकांना वेतन मिळाले होते किंवा नाही याची

कल्पना नव्हती. (साक्षीदाराने स्वतःहून असे सांगितले की, शिक्षकांना वेतन मिळाले नसल्याची बाब सर्व प्रथम दि. ०६.११.२०२४ रोजी प्राचार्यांना समजली व त्याच दिवशी ती बाब त्यांना अवधत करुन दिल्याचे त्यांनी सांगितली.) प्राचार्यांना दि. ०६.११.२०२४ रोजी शिक्षकांना वेतन मिळाले नसल्याबाबतची बाब अवधत होती किंवा कसे याची मला वैयक्तिक माहिती नाही. तपासी अधिकारी यांनी माझ्या समक्ष २० शिक्षकांची चौकशी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, संस्थेच्या संचालक मंडळास न कळवता प्राचार्यांनी आरोपीकडून १६ लाख भरुन घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्यादी जबाबामध्ये आरोपीने १६ लाख रुपये संस्थेमध्ये भरणा केल्याची बाब संस्थेच्या संचालक मंडळास सांगण्यात आली होती याबाबतचा स्पष्ट उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने संस्थेमध्ये १६ लाख रुपयाचा भरणा केला आहे ही बाब संचालक मंडळापासून लपून ठेवली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी व संस्थेच्या प्राचार्यांनी यापूर्वी देखिल आरोपीकडून संस्थेमध्ये पैश्यांचा भरणा करुन घेतला होता व त्याची माहिती संस्थेच्या संचालक मंडळास दिली नव्हती.

**(न्यायालयाची दुस—या सत्राची वेळ संपल्याने पुढील कामकाज दिनांक २१.११.२०२५ पर्यंत तहकूब करण्यात येत आहे. )**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी/—

**(वैभव व. कुलकर्णी)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : १८/११/२०२५.**